भाजप शहर जिल्हाध्यक्षपदी अनिल मोहिते यांची नियुक्ती

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : गेल्या सुमारे दीड महिन्यापासून पक्षांतर्गत गट-

तटातील वादाच्या भोवऱ्यात सापडल्यामुळे लांबणीवर पडलेल्या भाजपच्या शहर जिल्हाध्यक्षपदी अखेर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी निगडित अनिल मोहिते यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपमधील विखे गटाकडूनच मोहिते यांचे नाव पुढे केल्याने विखे गटाने निष्ठावंतांवर एकप्रकारे मात केल्याचे मानले जाते.

भाजपकडून या पदासाठी शिफारशी मागवल्या होत्या. त्यामध्ये सचिन पारखी, बाबासाहेब वाकळे व बाबासाहेब सानप या तिघांची नावे पक्षश्रेष्ठींकडे पाठवली गेली होती तर विखे गटाकडून धनंजय जाधव यांचे नाव पुढे करण्यात आले होते. त्यातून शहर पक्ष संघटनेवर विखे गटाचे की निष्ठावंतांचे प्राबल्य निर्माण होणार, असा वाद निर्माण झाला होता. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी निष्ठावंतांच्या पाठीमागे पाठबळ निर्माण केले होते. मात्र विखे गटाकडून ऐनवेळी संघाशी निगडित अनिल मोहिते यांचे नाव पुढे करून निष्ठावंतांवर मात केल्याचे मानले जाते. अनिल मोहिते हे राजाभाऊ मुळे यांच्या वर्चस्वाखालील विचार भारती या संघटनेशी संबंधित आहेत. राजाभाऊ मुळे हे पूर्वी संघाशी निगडित असले तरी भाजपमधील निष्ठावंतांचा त्यांना विरोध आहे. त्यामुळे संघाची निगडित मोहिते यांची जिल्हाध्यक्ष पदावर वर्णी लागली तरी भाजपच्या निष्ठावंतांमध्ये नाराजीचा सूर आहे.

मोहिते हे श्रीलक्ष्मी मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑप. सोसायटी (बुरुडगाव) तसेच लक्ष्मी अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटी (केडगाव) या पतसंस्थांचे संस्थापक अध्यक्ष आहेत तसेच त्यांचा ढवळपुरी येथे कृषीनाथ ग्रीन एनर्जी हा खासगी साखर कारखाना आहे. या कारखान्याचे ते उपाध्यक्ष आहेत. याशिवाय सिंदखेड राजा (बुलढाणा) येथील जिजामाता सहकारी साखर कारखान्याचे ते कार्यकारी संचालक म्हणूनही कार्यरत आहेत.

डॉ. तनपुरे कारखान्यासाठी ६० टक्के मतदान

राहुरीतील डॉ. तनपुरे सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळासाठी शनिवारी मतदान झाले. मतदान केंद्राबाहेर मतदारांच्या रांगा लागल्या होत्या.

आज मतमोजणी

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : राहुरीतील डॉ. बाबुराव तनपुरे सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाच्या २१ जागांसाठी आज, शनिवारी शांततेत मतदान झाले. एकूण ६० टक्के मतदान झाल्याचा अंदाज निवडणूक प्रशासनाने व्यक्त केला आहे. कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. उद्या, रविवारी मतमोजणी होणार आहे.

निवडणुकीत राहुरी बाजार समितीचे सभापती अरुण तनपुरे यांच्या नेतृत्वाखाली जनसेवा मंडळ, राजू शेटे यांच्या नेतृत्वाखालील शेतकरी विकास मंडळ व अमृत धुमाळ यांच्या नेतृत्वाखाली कारखाना बचाव कृती समिती असे तीन प्रमुख पॅनल निवडणुकीत उतरले होते. या तिन्ही पॅनल प्रमुखांनी मतदानानंतर विजयाचा दावा केला आहे. निवडणुकीत एकूण ५६ उमेदवार रिंगणात आहेत.

एकूण २१ हजार २८३ मतदारांपैकी १२ हजार ६६२ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मतदार यादीत मयत मतदारांचा मोठ्या प्रमाणावर समावेश होता. आज सकाळपासूनच मतदारांमध्ये उत्साह होता. कारखाना कार्यस्थळावरील विद्यालयाच्या वर्गखोल्यांतून मतदान केंद्र होते. तेथे मतदारांच्या रांगा लागलेल्या होत्या.

कारखाना गेल्या चार वर्षांपासून बंद आहे तसेच जिल्हा बँकेने कर्जामुळे जप्तही केलेला आहे. मात्र न्यायालयाच्या आदेशानुसार निवडणूक होत आहे.

सकाळपासूनच मतदारांच्या केंद्रावर रांगा लागल्या होत्या. सुमारे सात वर्षांनंतर मतदारांना मतदानाची संधी मिळाली आहे. मोठ्या प्रमाणावर मतदार बाहेर पडल्याने रस्त्यावरील वाहतूकही विस्कळीत झाली होती. जनसेवा व शेतकरी विकास मंडळाने मतदारांना केंद्रावर आणण्यासाठी वाहनांची व्यवस्था केली होती.

दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप.बँक लि.,

मुख्य कार्यालय-परळी वैजनाथ जि.बीड । शाखा : श्रीरामपूर

जाहीर लिलाव - विक्री सूचना

सेक्यूरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फानान्शियल असेटस् ॲण्ड एन्फेर्समेंट ऑफ सेक्यूरिटी इंटरेस्ट ॲक्ट,२००२ अंतर्गत गहाण/स्थावर मालमत्तेची विक्री ज्याअर्थी, **दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप.बँक लि.**, चे प्राधिकृत अधिकारी यांनी खालील मालमत्तेचा **प्रत्यक्ष ताबा** घेतला आहे. खालील कर्जदारांना "**जेथे आहे तशी आणि जशी आहे तशी**" स्थितीत सेक्यूरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फानान्शियल असेटस् ॲण्ड एन्फेर्समेंट ऑफ सेक्यूरिटी इंटरेस्ट ॲक्ट,२००२ च्या मधील कलम १३ (२) अन्वये मालमत्ता विक्री करण्याचा अधिकार बँकेच्या कर्जाची परिपुर्ती करण्यासाठी कळविले होते. च्या अनुषंगाने कर्जदाराने परिपुर्ती करण्यास कसुर केला त्याअर्थी अर्जदारास व तमाम जनतेस कळविण्यात येते की, खाली सही करणार यांनी खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीचा उपरोक्त कायद्याचे कलम १३ (४) अन्वये वरील मालमत्तेची विक्री बिड/लिलावाद्वारे खाली सही करणाराकडून विक्री केली जाईल.

अचल (तारण) मालमत्तेचे विवरण

अ. क्र.	ऋणकोचे नांव / तारणदाराचे नांव	शाखेचे नांव खाते क्र.	देय रक्कम रुपये+ न आकारलेले व्याज वगळून अधिक खर्च रुपये	आरक्षित किंमत रक्कम रुपये	अचल मालमत्तेचे विवरण
१	**कर्जदार** **१. घोरपडे कृषी सेवा केंद्र** **प्रो.श्री जोगेंद्र सुहास घोरपडे** शॉप नं.१९६, मार्केट यार्ड कॉम्प्लेक्स, कांदा मार्केट जवळ, श्रीरामपूर, जि.अहमदनगर **जामिनदार,** **२.श्री विनोद असाराम घोरपडे** वार्ड नं.६, सुभाष कॉलनी, नेवासा रोड, श्रीरामपूर, जि.अहमदनगर **जामिनदार,** **३.श्री अतुल सुहास घोरपडे** वार्ड नं.६, सुभाष कॉलनी, नेवासा रोड, श्रीरामपूर, जि.अहमदनगर	**श्रीरामपूर** **खाते क्र.२/१४**	रु.२०,६६,९५४.३१ दि.१०/०७/२०२३ पर्यंत आणि व्याज व इतर खर्च दि.११/०७/२०२३ पासुन येणे.	रु. ११,२२,७००/- (अक्षरी रुपये अक रा लाख बावीस हजार सातशे फक्त)	१) कर्जदार यांच्या नावावरील मौजे श्रीरामपूर येथील न.प.श्रीरामपूर स.नं.४२/२ए (पी) न्यु स.नं.३९/१४० (पी), सीटीएस नं.२१३९ (पी), टी.पी.स्कीम नं.४ (परपोझज), फ्लॅट नं.९०/१ (पी) रेसिडेन्सल प्लॉट एरिया ०० हे. ०१ आर. म्हणजे १०० चौ.मी., दक्षिण उत्तर ५० फुट म्हणजे १५.२४ मी. व वाईड पुर्व पश्चिम २२ फुट म्हणजे ६.७० मी. **चतुःसिमा** पुर्व : बाबुराव पांडुरंग कुल्थे यांचा प्लॉट सीटीएस नं.२१३९ (पी), दक्षिण : पुर्व पश्चिम चार (चारी) पश्चिम : कोळी यांचा प्लॉट सीटीएस नं.२१३९ (पी), उत्तर : रोड व मैद गुरुजी यांचा प्लॉट
				रु. ११,९१,०६०/- (अक्षरी रुपये अकरा लाख ऐक्यान्नव हजार साठ फक्त)	२) जामीनदार अतुल सुहास घोरपडे यांच्या नावावरील मौजे सावेदी, अहमदनगर येथील स.नं.४८/५ बी, फ्लॅट नं.१, बिल्टप एरिया ४२.०० चौ.मी. कॉमन प्रोजेक्शन एरिया ७.०७ चौ.मी. एकुण विक्री योग्य एरिया ४९.०७ चौ.मी. तळ मजला, गनराज रेसिडेन्सी प्लॉट नं.३, क्षेत्र.२८२.०० चौ.मी. **चतुःसिमा** पुर्व : ३ मी. वाईड रियल मार्जिन पश्चिम : १.५ मी.वाईड बाजू मार्जिन व फ्लॅट नं.२ दक्षिण : स्टार केस व फ्लॅट नं.२ उत्तर : १.५ वाईड बाजू मार्जिन **(प्रत्यक्ष ताबा)**

विक्रीच्या अटी व शर्ती :

१. सहभाग धारकाला ओळखीच्या पुराव्यासह बंद पाकीटात मालमत्तेच्या राखीव किंमतीच्या १० टक्के समतुल्य ''बयाणा रक्कम'' ठेवणे आवश्यक आहे. आमच्या **शाखा - श्रीरामपूर** येथे निविधा फॉर्म उपलब्ध असेल.
२. बयाणा रक्कम प्राधिकृत अधिकारी **दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप.बँक लि.,यांचे नावे श्रीरामपूर** येथे देय असलेल्या शेड्यूल्ड/राष्ट्रीयकृत/कमर्शियल बँकेचा बँकर्स चेक /डिमांड ड्राफ्ट द्वारे स्विकारली जाईल. बिड मंजुर न झाल्यास बयाणा रक्कम परत केली जाईल. वरील उद्देशाकरीता नगद/धनादेश स्वरुपातील रक्कम स्विकारली जाणार नाही. बोली बोलणाऱ्याने बयाणा रक्कम न भरल्यास लिलावात सहभागी होण्याची परवानगी दिली जाणार नाही.
३. लिलावात सहभागी होण्याकरीता बोली बोलणाऱ्याकडे (के.वाय.सी.)ओळखपत्र म्हणून पॅन कार्ड/ड्रायव्हींग लायसन्सं/मतदान ओळखपत्र असणे गरजेचे आहे.
४. लिलावादरम्यान बिडरला उच्चतंम बोली बोलण्याची परवानगी दिली जाईल, आणि अंतिम बोली बोलणाऱ्याच्या अंतिम बोलीपेक्षा किमान २५,०००/-(पंचेवीस हजार) रुपयाने जास्त असेल. जास्त बोली बोलणाऱ्यास १० मिनीटांचा कालावधी दिला जाईल. आणि जर बोली बोलणाऱ्याकडून १० मिनीटांत उच्चतंम बोली बोलली गेली नाही तर लिलाव बंद करण्यात येईल.
५. इच्छुक बोलीदार/बिडरने मालमत्तेच्या लिलावाच्या विक्री विषयक अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचाव्यात आणि त्यांचे तंतोतंत पालन करावे. बोली बोलण्यापुर्वी/बोली बोलण्या दरम्यान जर काही अडचण किंवा गरज भासली तर ते प्राधिकृत अधिकारी **श्री भगवान चोखाजी जाधव (मो.८४११००३५८२)** यांच्याशी संपर्क करु शकतात.
६. यशस्वी बोली बोलणाऱ्यास बिडर रकमेच्या २५ टक्के (पंचविस टक्के) रक्कम त्वरीत भरावी लागेल. (ज्या रकमेतून बयाणा रक्कम वजा करुन उर्वरित रक्कम लिलाव दिनांकापासून १५ दिवसांचे आत भरावी लागेल). निर्धारित वेळेत यशस्वी बोलीदाराने उर्वरित रक्कम न भरल्यास प्राधिकृत अधिकाऱ्याकडून त्याची जमा केलेली रक्कम जप्त करण्यात येईल. प्राधिकृत अधिकाऱ्याला लिलाव रद्द करण्याचा आणि नविन लिलाव ठेवण्याचा अधिकार राहील.
७. विक्री प्रमाणपत्र चे मुद्रांकशूल्क आणि नोंदणीचे इतर सर्व खर्च यशस्वी बोलीदार/बिडर्सचे असतील.
८. कुठल्याही शुल्कासाठी प्राधिकृत अधिकारी यांची जबाबदारी असणार नाही (जसे की, मालमत्तेच्या विक्री अंतर्गत कुठलेही मंडळ किंवा ताबा हक्क, अडथळे मालमत्ता कर किंवा शासनाची इतर कुठलेही देय रक्कम इ.)
९. मथळा, क्षेत्र, देणी, (ड्यूज) इत्यादी मालमत्तेचे बाह्य पडताळणी आणि देय जाणून घ्यावे.
१०.निविदा बोलीदार/बिडरच्या उपस्थितीत **दि.२५/०६/२०२५ रोजी दुपारी १२.०० ते १.०० वाजता** उघडण्यात येतील आणि बोलीदारांना बोली बोलण्यास संधी दिली जाईल. निविदा बयाणा रक्कमेसह **दि.२४/०६/२०२५ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप.बँक लि.,शाखा श्रीरामपूर** येथे पोहचली पाहिजे.
११.प्राधिकृत अधिकारी यांना कुठलेही कारण न देता कोणतीही बोली नाकारण्याचा/स्थगीत करण्याचा/पुढे ढकलण्याचा/रद्द करण्याचा संपुर्ण अधिकार आहे. स्थावर मालमत्ता विक्री करण्यास बँकेची कुठलीही बांधीलकी/प्रतिनिधीत्व या सुचनेत असणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.
१२.मालमत्ता तपासणीसाठी इच्छुक बोलीधारकांनी **श्री एस.वाय.यादव, शाखा व्यवस्थापक, शाखा : श्रीरामपूर** यांच्याशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत **दि.२३/०६/२०२५ पर्यंत (मो.८००७७७९८९४)** या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधावा.

टिप : हि सुचना कर्जदार/जामीनदार/गहाण ठेवणाऱ्यांच्या वरील कर्जाविषयी उपरोक्त उल्लेखित केलेल्या तारखेस आणि इतर विवरणाप्रमाणे विक्री आहे.

स्वाक्षरीत/-

दिनांक : ३१/०५/२०२५ (स्वैर भाषांतर तफावत असल्यास इंग्रजी ग्राह्य) **प्राधिकृत अधिकारी**

ठिकाण : परळी-वै. **दि वैद्यनाथ अर्बन को-ऑप.बँक लि., मुख्य कार्यालय, परळी-वैजनाथ**

विवाह समारंभासाठी मराठा समाजाची आचारसंहिता

अंमलबजावणीसाठी ११ जणांची सुकाणू समिती

लोकसत्ता प्रतिनिधी

अहिल्यानगर : राज्यभर गाजत असलेल्या पुण्यातील वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणानंतर मराठा समाजाने विवाह समारंभासाठी आचारसंहिता तयार केली आहे. त्यामध्ये हुंडा घेऊ नका व देऊ नका याबरोबरच लग्नात डीजे व प्री-वेडिंगला बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला. आचारसंहिता अंमलबजावणीसाठी ११ जणांची सुकाणू समिती स्थापन करण्यात आली आहे.

हभप बद्रिनाथ महाराज तनपुरे यांच्या अध्यक्षतेखाली मराठा समाजाची बैठक अहिल्यानगरमध्ये एन. बी. धुमाळ फाउंडेशनने आयोजित केली होती. या वेळी माजी कुलगुरू सर्जेराव निमसे, सकल मराठा समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत गाडे, अखिल भारतीय मराठा महासंघाचे सरचिटणीस संभाजी दहातोंडे, जिल्हाध्यक्ष सुरेश इथापे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे, जिजाऊ ब्रिगेडचे राज्य कार्याध्यक्ष राज्यश्री शितोळे, किशोर मरकड, मराठा वधू-वर सूचक मंडळाचे अशोक कुटे, माजी प्राचार्य खासेराव शितोळे, विठ्ठल गुंजाळ, ज्ञानेश्वर काळे आदी उपस्थित होते.

या बैठकीनंतर माहिती देताना हभप तनपुरे महाराज यांनी सांगितले, की मराठा समाजाने अनिष्ट रूढींना तिलांजली द्यावी, बदल करण्यासाठी प्रथम स्वतः प्रत्येकाने बदल करावा. आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी तालुकानिहाय समिती स्थापन करावी. डॉ. निमसे म्हणाले, विवाह सोहळ्याच्या आचारसंहितेबाबत जनजागृती करण्यासाठी कीर्तनकार, प्रबोधनकार यांनी पुढाकार घ्यावा. ग्रामीण भागात मुलांच्या विवाहाची समस्या मोठी आहे. त्यावरही गांभीर्याने विचार करावा लागणार आहे.

चंद्रकांत गाडे म्हणाले, 'विवाहाच्या वेळी मुलींकडून अवास्तव अटी येऊ लागल्याने मुलांचे विवाह होत नाहीत. त्यामुळे विवाहेच्छू मुलांबरोबरच पालकही हतबल झाले आहेत. पालकांनी आपल्या अतिरिक्त अपेक्षा कमी कराव्यात.

आचारसंहिता

- मराठा समाजाने विवाह सोहळा १०० ते २०० लोकांच्या उपस्थितीत साजरा करावा.
- केवळ पारंपरिक वाद्य व लोककलावंतांचा वापर करावा.
- प्री-वेडिंग हा प्रकार बंद करावा. विवाह, वाढदिवस, उद्घाटन कार्यक्रमात साड्या, भेटवस्तू देऊ नयेत.
- लग्नात हुंडा देऊ व घेऊ नये.
- लग्न, साखरपुडा, हळद एकाच दिवशी करावे.
- दशक्रिया विधी व तेराव्याच्या निमित्ताने घातली जाणारी भोजनावळ बंद करावी.

थोरात, विखे यांनी मोठेपणातून दोन्ही कारखाने बिनविरोध केले

सुजय विखे यांचा गौप्यस्फोट

लोकसत्ता वार्ताहर

राहाता : स्वर्गीय बाळासाहेब विखे पाटील यांची सहकारामध्ये कोणतेही राजकारण न आणण्याची भावना होती. या भावनेचा आदर करुन माजी मंत्री बाळासाहेब थोरात व जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे या दोन्ही नेत्यांनी दोन्ही कारखाने बिनविरोध केले, असा गौप्यस्फोट माजी खासदार डॉ. सुजय विखे यांनी केला. तर, इकडेही एक माजी खासदार अध्यक्ष झाले आणि तिकडेही एक माजी मंत्री अध्यक्ष झाले, अशी मिश्किल टिप्पणी देखील सुजय विखे यांनी केली.

शिर्डी विधानसभा मतदारसंघातील व संगमनेर तालुक्यातील खळी, पिंप्री - लौकी अजमपुर, शिबलापूर येथे निळवंडे पाण्याचे जलपुजन, तसेच शिबलापुर येथे महावितरणच्या नवीन उपकेंद्राचे भुमीपुजन व बहिरोबा मंदिर परिसर सुशोभीकरणाचे उद्घाटन डॉ. विखे यांच्या हस्ते पार पडले.

विखे म्हणाले की, संगमनेरच्या आमदारासाठी फक्त सहा ठिकाणी घेतलेल्या प्रभावी सभा, मनात विश्वास निर्माण करण्यास कारणीभूत ठरल्याने त्याचा फायदा अमोल खताळ यांना झाला. या निवडणुकीत संगमनेरच्या माजी आमदाराने विकासाची कामगिरी मांडण्याऐवजी नकारात्मक व खालच्या पातळीवर टिका केल्याने त्यांना या निवडणुकीत जनतेने नाकारले अशी बोचरी टिका माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे नाव न घेता त्यांच्यावर करताना द्वेषाचे नव्हे तर, विकासाचे राजकारण करण्याचा सल्लाही त्यांना दिला. तसेच जोपर्यंत बाळासाहेब थोरात माझे भावीचं स्वप्न पुर्ण करत नाही. तोपर्यंत थोरात यांची गॅरंटी नाही, असा खोचक टोला देखील डॉ. विखे यांनी थोरात यांना लगावला. तर, आमदार अमोल खताळ यांना विकास कामे करुन द्या, असे आवाहन विखे यांनी केले.

कोल्हारमध्ये जेरबंद पाचवा बिबट्या पिंजऱ्यातून पळाला

लोकसत्ता वार्ताहर

राहाता : अवघ्या ९ दिवसांपूर्वी कोल्हार बुद्रुक येथे एकाच ठिकाणी वेगवेगळ्या दिवशी चार बिबटे जेरबंद झाल्याची घटना तसेच दोन दिवसांपूर्वी दोन बिबट्यांच्या झुंजीत एकाचा मृत्यू झाल्याची घटना ताजी असतानाच काल, शुक्रवारी रात्री कोल्हार बुद्रुक येथे निबे वस्तीजवळ पाचवा बिबट्या पिंजऱ्यात अडकला होता. मात्र, पिंजऱ्याच्या तळाला असलेले प्लायवूड तोडून बिबट्याने पलायन केले. ही घटना आज, शनिवारी वनविभाग व शेतकऱ्यांच्या लक्षात आली. यामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पुन्हा याच ठिकाणी नवीन पिंजरा लावण्यात आला आहे.

कोल्हार बुद्रुक आणि भगवतीपूर गावासाठी नवीन साठवण तलावाच्या निर्मितीचे काम सुरू आहे. याच भागात गेल्या सव्वा महिन्याच्या कालावधीत एकापाठोपाठ एक बिबटे पिंजऱ्यात अडकत आहेत. एका पाठोपाठ तब्बल ५ बिबटे आत्तापर्यंत या एकाच ठिकाणी जेरबंद झाले आहेत. बिबट्याला जेरबंद करण्यासाठी वनविभागाने आठ दिवसांपूर्वी याच भागात पिंजरा लावला होता. पावसामुळे शेतात पाणी साचले होते. या पाण्यामुळे पिंजऱ्याच्या खालील भागात असलेले प्लायवूड पाण्याने भिजल्याने ते फुगले होते.

जेरबंद झालेल्या बिबट्याने प्लायवूड तोडून, जमीन उकरून पिंजऱ्याच्या खालून पलायन केल्याची माहिती वनरक्षक प्रतीक गजेवार यांनी दिली. रात्री जेरबंद झालेल्या बिबट्याला ताब्यात घेण्यासाठी वनविभागाचे कर्मचारी व शेतकरी आज सकाळी घटनास्थळी आले असता त्यांना पिंजऱ्यात बिबट्या दिसून न आल्याने सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला. बिबट्याने पलायन केल्याने या भागातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

खराब झालेल्या पिंजऱ्याच्या जागेवर नवीन पिंजरा लावण्यात आल्याचे वनरक्षक प्रतीक गजेवार यांनी सांगितले. शुक्रवारी रात्री पिंजऱ्यात अडकलेला बिबट्या हा मादी जातीचा असून मोठ्या आकाराचा असल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले. गेल्या सव्वा महिन्याच्या कालावधीत या एकाच ठिकाणी एकापाठोपाठ पिंजऱ्यात जेरबंद होणारा हा पाचवा बिबट्या होता. दोन दिवसांपूर्वी कोल्हार बुद्रुक येथे राजुरी रस्त्यालगत कापसे वस्तीवर दोन बिबट्यांच्या झुंजीमध्ये एक बिबट्या मृत्युमुखी पडला. एकाच जागेवर इतके बिबटे पकडले जाण्याची बहुदा ही पहिलीच घटना असावी. याच भागात अजूनही बिबट्यांचे वास्तव्य असल्याचे येथील शेतकऱ्यांनी सांगितले. वनविभागाच्या हलगर्जीपणाबाबत शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

माहेश्वरी सभेच्यावतीने विविध स्पर्धा

संगमनेर : माहेश्वरी समाजाच्या वंशोत्पत्ती दिन म्हणून साजऱ्या होणाऱ्या महेश नवमीनिमित्त संगमनेर तालुका माहेश्वरी सभा आणि सहयोगी संस्थांने १ जून ते ९ जून या कालावधीत विविध कार्यक्रमांचे आणि स्पर्धांचे आयोजन केल्याची माहिती तालुकाध्यक्ष श्रीनिवास भंडारी, सचिव जुगलकिशोर बाहेती यांनी दिली. माहेश्वरी पंच ट्रस्टचे अध्यक्ष व मालपाणी उद्योग समूहाचे संचालक गिरीश मालपाणी यांनी समाजबांधवांना महेश नवमी उत्सवासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे. स्पर्धांसाठी एकूण ५० हजार रुपयांची बक्षिसे आहेत. १ जूनला 'आयर्न मॅन', २ जून रस्सीखेच, जलद चालणे, कॅरम स्पर्धा, ३ जून 'युवा महेश'च्या सहकार्याने रक्तदान शिबिर व चित्रकला स्पर्धा, ५ जून पोहणे, बॅडमिंटन, तसेच माहेश्वरी ज्येष्ठ महिला मंडळाच्या सहकार्याने 'एक मिनिट स्पर्धा' ६ आणि ७ जूनला 'माहेश्वरी फ्रेंड्स प्रीमियर क्रिकेट लीग' आयोजित केली आहे. ८ जूनला 'ट्रेजर हंट' आणि भजन स्पर्धा, ९ जूनला सायंकाळी ५ वा. शोभायात्रा आहे. त्यानंतर बालाजी मंदिरात महेश भगवान यांना अभिषेक होणार आहे. या कार्यक्रमांस समाजबांधवांना उपस्थित राहण्याचे आवाहन उपाध्यक्ष संजय मालपाणी, सुजितकुमार खटोड, सचिन मणियार, जयप्रकाश भुतडा, गिरीश मालपाणी, विश्वनाथ कलंत्री, अतुल झंवर आदींनी केले आहे.

गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (पूर्वी पुनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे)

नोंदणीकृत कार्यालय : 6वा मजला, बी- बिल्डिंग, गंगा टूएनो, लोहेगाव, पुणे - 411014. शाखा कार्यालय युनिट : तिसरा मजला, कार्यालय क्र. 301, बिझनेस सेंटर, प्रोफेसर कॉलनी चौक, सावेडी, फायनल प्लॉट क्र. 125+126/64, अहमदनगर, महाराष्ट्र - 414003.

ई-लिलाव - विक्री सूचना सर्फेसी कायद्या अंतर्गत सुरक्षित स्थावर मत्तेची विक्री

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8 आणि 9 सह वाचण्यात येणाऱ्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शीअल अॅसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अधिनियम, 2002 ("कायदा") अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना. याद्वारे सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार / सह-कर्जदार / गहाणदार / जामीनदार यांना सूचना देण्यात येत आहे कि, खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता हि **गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (पूर्वीची पुनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी, दि. 17 नोव्हेंबर 2023 रोजीच्या प्रभावापासून पुनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड चे नाव बदलून गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड असे झाले.) (पूर्वीची मॅग्मा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड आणि मूळतः जीई मनी हाऊसिंग फायनान्स पब्लिक अनलिमिटेड कंपनी च्या नावाने अंतर्भूत आहे)** (यापुढे कायद्यानुसार "**सुरक्षित धनको**" म्हणून संदर्भित) यांच्याकडे तारण ठेवलेली असून, ज्याचा ताबा सुरक्षित धनको यांचे प्राधिकृत अधिकारी यांनी अधिनियमाच्या कलम 13(2) अन्वये दिलेल्या सूचनेनुसार सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियमाच्या नियम 8 आणि 9 सह वाचलेल्या कायद्याच्या कलम 13(12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून घेतला आहे. सुरक्षित मालमत्तेची विक्री **''जशी आहे जेथे आहे'', ''जशी आहे जे काही आहे'' आणि ''तेथे जे काही आहे''** तत्त्वावर ई-लिलावाद्वारे दि. 03/07/2025 रोजी केली जाईल. याद्वारे सर्वसामान्य जनतेस कळविण्यात येते की, आम्ही **https://www.bankeauctions.com** या वेबसाइटवर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे जाहीर लिलाव आयोजित करणार आहोत. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी, कृपया जीएचएफएल / सुरक्षित धनको यांच्या वेबसाइटवर दिलेली लिंक म्हणजे **www.grihumhousing.com** चा संदर्भ घ्या.

अ. क्र.	प्रस्ताव क्र. ग्राहकाचे नाव (ए)	मागणी सूचना तारीख व थकित रक्कम (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	मालमत्तेचे वर्णन (डी)	राखीव किंमत (ई)	इरठे (राखीव किंमतीच्या 10%) (एफ)	इरठे सादरीकरणाची तारीख (जी)	बोली वृद्धी (एच)	मालमत्तेच्या पाहणीची तारीख व वेळ (आय)	लिलावाची तारीख व वेळ (जे)	ज्ञात भार / न्यायालयिन प्रकरणे, जर असल्यास (के)
1	**कर्ज क्र. HF0336H20100027** **चांदबी कलाम मोहम्मद (कर्जदार), कलाम मुस्लिम मोहम्मद**	**सूचना दिनांक : 07/02/2024 एकूण देय : रु. 1168489/- (रुपये अकरा लाख अडुसष्ट हजार चारशे एकोणनव्वद फक्त) दि. 07/02/2024 रोजी नुसार देय, सोबत पेमेंट देईपर्यंतचे 10% वार्षिक दराने व्याज.**	**प्रत्यक्ष**	पुढील मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे, फ्लॅट क्र 1, पहिला मजला प्लॉट क्र 16 स क्र 142 4बी गुरु अपार्टमेंट गणपती मंदिराजवळ मौजे नागापूर अहमदनगर जिल्हा अहमदनगर मोजमाप 42.73 चौ. मी. गणपती मंदिर पिन कोड - 414111 **चतुःसीमा पुढीलप्रमाणे :- पूर्व :-** आकाशापर्यंत खुले आणि पॅसेज, **पश्चिम :-** फ्लॅट क्र 03, **उत्तर :-** जिना, **दक्षिण :-** आकाशापर्यंत खुले आणि बाजूचा मार्जिन.	**रु. 1050438/- (दहा लाख पन्नास हजार चारशे अडतीस)**	रु. 105043.8/- (एक लाख पाच हजार त्रेचाळीस आणि ऐंशी पैसे)	**30/06/2025 रोजी सायं 05.00 वा. पूर्वी**	10,000/-	**23/06/2025 (स. 11.00 - दु. 4.00)**	**03/07/2025 (स. 11.00 - दु. 02.00)**	निरंक

इच्छुक बोलीदार / खरेदीदारांना सल्ला दिला जात आहे कि, सुरक्षित धनको शाखा आणि लिलाव मालमत्तेला भेट द्यावी आणि स्वतःची चौकशी करावी आणि बोली सादर करण्यापूर्वी आणि अतिरिक्त शुल्क, बोजा आणि कोणत्याही तृतीय-पक्षाच्या हितसंबंधांची खात्री करून घेणे आणि त्याच्या सर्व पैलूंमध्ये स्वतःचे / स्वतः समाधान करून घ्यावे. सर्व वैधानिक देय जसे की मालमत्ता कर, वीज / पाणी देय आणि इतर कोणतीही देयके, जर असतील तर, निश्चित केली जावीत आणि ती यशस्वी बोलीदाराने भरावीत.

इच्छुक बोलीदारांनी पोर्टलवर स्वतःची नोंदणी करणे आवश्यक आहे आणि लिलाव सेवा प्रदाता - सी1 इंडिया प्रा. लि. यांच्याकडून लॉगिन आयडी आणि पासवर्ड आधीच प्राप्त करणे आवश्यक आहे, जे ई-बिडिंगसाठी अनिवार्य असणार आहे - सी1 इंडिया प्रा. लि., पत्ता- प्लॉट क्र. - 68, तिसरा मजला, गुडगाव हरियाणा- 122003. हेल्पलाइन क्रमांक - 7291981124, 25, 26 सपोर्ट ईमेल आयडी - Support@bankeauctions.com. **संपर्क व्यक्ती - धरनी पी, ईमेल आयडी- dharani.p@c1india.com संपर्क क्रमांक- 9948182222.** कृपया लक्षात घ्या की संभाव्य बोलीदार केवळ त्यांच्याकडूनच ई-लिलावाचे ऑनलाइन प्रशिक्षण घेऊ शकतात. इच्छुक खरेदीदार / बोलीदार यांनी बयाणा रक्कम ठेव (ईएमडी) "गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड" च्या खात्यात, बँक- आयसीआयसीआय बँक लि. खाते क्रमांक- 000651000460 आणि आयएफएससी कोड- ICIC0000006, 20, आर.एन. मुखर्जी रोड- कोलकाता- 700001 येथे कोणत्याही राष्ट्रीयकृत किंवा अनुसूचित बँकेवरील काढलेले एनईएफटी / आरटीजीएस / डीडी द्वारे **दि. 30/06/2025 रोजी किंवा त्यापूर्वी सादर करणे आवश्यक आहे आणि त्यांची नावे https://www.bankeauctions.com** वर नोंदवा आणि युजर आयडी आणि पासवर्ड मोफत मिळवा तसेच सेवा प्रदात्याकडून ई-लिलावाचे प्रशिक्षण घ्या. वेबसाइटवर त्यांची नोंदणी केल्यानंतर, इच्छुक खरेदीदार / बोलीदार यांनी खालील कागदपत्रांच्या प्रती ई-मेलवर अपलोड करणे आणि खालील पत्त्यावर स्व-साक्षांकित हार्ड कॉपी पाठवणे आवश्यक आहे : तिसरा मजला, कार्यालय क्र. 301, बिझन